बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

Corporate Communications & Investor Relations
**Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5**
**TELE -020:25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 487**

वृत्तपत्रीय निवेदन

## श्री आशीष पांडे यांची बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती



**पुणे दिनांक 31 डिसेंबर , 2021:** श्री आशीष पांडे यांनी आज दिनांक 31 डिसेंबर 2021 रोजी बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक म्हणून सूत्रे हाती घेतली. बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये रुजू होण्यापूर्वी श्री आशीष पांडे हे युनियन बँक ऑफ इंडिया मध्ये मुख्य सरव्यवस्थापक व मुख्य परिचालन अधिकारी होते. श्री आशीष पांडे यांची बँकिंग क्षेत्रातील सुमारे 24 वर्षांची व्यावसायिक कारकीर्द असून, कर्ज व्यवहार, कर्ज संनियंत्रण, कोषागार व व्यापारी बँकिंग, विदेशी चलन विनिमय व्यवहार व संयुक्त उपक्रम, विपणन व ग्राहक संबंध व बँकिंग परिचालन अशी विविध खाती व विभाग सांभाळले आहेत.

श्री आशीष पांडे यांत्रिक अभियांत्रिकीत पदवीधर असून वित्त व विपणन विषयामधील व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी प्राविण्यासह प्राप्त केली आहे. ते भारतीय बँकर्स संस्थेचे प्रमाणित सहयोगी असून जीवन व सर्वसाधारण विमा, म्युचुयल फण्ड्स व डिमैट परिचालन ह्या मध्ये त्यांनी राष्ट्रीय शेयर बाजाराचे प्रमाणन प्राप्त केले आहे. त्यांनी बंगलोर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेचा कार्यकारी नेतृत्व विषयक अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. कोर्पोरेशन बँकेच्या मुंबई मधील औद्योगिक वित्त शाखेतून श्री पांडे यांनी आपली कारकीर्द सुरू केली व गुंतवणूक व आंतरराष्ट्रीय बँकिंग विभागात सुद्धा काम केले.

युनियन बँकेत मुख्य सरव्यवस्थापक व मुख्य परिचालन अधिकारी म्हणून बँकेत विलीन करण्यात आलेल्या दोन बँकांचे विविध प्रक्रियांचे पुंनर्भियांत्रिकीकरण , स्वयंचालन व डिजिटायझेशन यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडली. व्हाट्स अप बँकिंग, इ - नामनिर्देशन, मृत्यू दाव्यांचा ऑनलाईन निपटारा , धनादेश पुस्तिकेचा मागोवा, व्हिडिओ केवायसी प्रक्रिया, संभाव्य अचालीत चालू व बचत खाती ओळखणारी यंत्रणा, स्वयंचालनात यंत्रमानवाचा उपयोग, ग्राहकांच्या दारात बँकिंग सेवा, दस्तऐवजांचे डिजिटल निष्पादन , माझी दैनंदिनी ( बँकेच्या डेटाविषयक अंतर्गत गरजांसाठी संकेतस्थळ ), पॉजिटिव्ह पे, स्वयंचलित खाते विवरण असे अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग करणाऱ्या चमूचे ते युनियन बँकेत प्रमुख होते. .

Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020:25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 487

युनियन बँक ऑफ इंडिया मध्ये पत संनियंत्रण व पुनर्रचना विभागाचे सरव्यवस्थापक असताना श्री पांडे यांनी डाटा विश्लेषण, भाकीत आधारित प्रारुपण , यंत्रमानवीय प्रक्रियेचे स्वयंचालन व यांत्रिक अध्ययन अशा नावीन्यपूर्ण साधनाच्या द्वारे बँकेतील कर्जखात्यांचे संनियंत्रण व व्यवस्थापनात सर्वांगीण संधारण केले.

युंनियन बँक ऑफ इंडियाच्या जयपूर विभागाचे प्रमुख ( उपसरव्यवस्थापक ) म्हणून श्री पांडे यांनी राजस्थानात बँकेचे नेतृत्व केले व सर्व क्षेत्रातील व्यापार व औद्योगिक उपक्रमांना वित्तीय सहाय्य करून सर्वांगीण सुधारणा घडवून आणली. त्यापूर्वी ते युंनियन बँक ऑफ इंडियाच्या अध्यक्षांच्या सचिवलयात कार्यरत होते. त्यांनी SARAL (विशेष कर्ज प्रक्रिया कक्ष ) नेतृत्व केले आहे. तत्पूर्वी त्यांनी बँकेच्या मुंबई मधील औद्योगिक वित्तसहाय्य शाखेत काम केले आहे. आपल्या कारकिर्दीच्या सुरवातीच्या टप्प्यात ते युनियन बँक ऑफ इंडियाच्या विमा व म्युचूअल फंड व्यवसाय प्रकल्पाचे ते व्यवस्थापक होते.

श्री पांडे भारतीय बँक महासंघाने सार्वजनिक बँकांच्या सहयोगाने स्थापित केलेल्या बँकिंग महासंघाच्या संचालक मंडळावर नामनिर्देशित संचालक आहेत.